# * प्रकरण पहिले *

## साठोत्तरी ललितगद्य लेखन स्वरूप आणि विशेष

# प्रकरण पहिले

# साठोत्तरी ललित गद्य लेखन : स्वरूप आणि विशेष

प्रास्ताविक

१. ललित गद्य लेखन स्वरूप आणि विशेष

२. ललितलेखन म्हणजे काय ?

ललितचा अर्थ

ललितची व्याख्या

३. लघुनिबंध

ललितगद्य

मुक्तगद्य / ललितलेखन

४. प्रवासवर्णन

५. 'मी' चा आविष्कार

६. समाविष्ट होणारे घटक : व्यक्ती, प्राणी, निसर्ग.

७. जीवनातील स्मृती आणि संदर्भ

८. ललितलेखन प्रकाराचे विशेष / भाषाशैली

समारोप

*****

# प्रकरण पहिले

# साठोत्तरी ललित गद्य लेखन : स्वरूप आणि विशेष

**प्रास्ताविक :-**

कोणत्याही साहित्याचा अभ्यास करताना त्याचे स्वरूप आणि विशेष यांचा आढावा घ्यावा लागतो. त्या साहित्याचा पूर्णपणे विचार करावा लागतो. कोणतीही कलाकृती निर्माण होत असताना ती सहजरित्या निर्माण होत नसते. त्यामध्ये अनेक स्थित्यंतरेही होत असतात. त्याप्रमाणे, ललित लेखन या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यापूर्वी शब्दचित्र–स्वभावचित्र–लघुनिबंध–ललितगद्य–मुक्तगद्य–ललित लेखन असा प्रवास रूढ होतो.

**१.१ ललित गद्य लेखन : स्वरूप आणि विशेष :-**

**स्वरूप –**

मराठी साहित्यामध्ये पद्य वाङ्.मय हे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. गद्यवाङ्मय कमी प्रमाणात असले तरी ललितगद्याचा विचार करत असताना आपल्याला महानुभावीय व बखर वाङ्मयापर्यंत जाणे भाग पडते. महानुभावीय गद्य वाङ्मय हे सर्वसमावेशक असल्याचे आढळून येते, ''व्यक्तिचित्रण, समाजदर्शन, अध्यात्मचिंतन, तत्त्वचर्चा, विनोदात्मकता इत्यादी विविध हेतूंसाठी या गद्याचा वापर करण्यात आला होता.'' आजचे ललितगद्य अभ्यासले असता आपल्याला असे दिसून येते की, 'ते सुद्‌धा जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करीत विविधतेने नटलेले आहे.'

ललितगद्य हा 'मी' चा घेतलेला जाणिवनिष्ठ शोध असतो. ललितगद्य हे आज एकूण अनुभवविश्वातील व्यक्तिनिष्ठ आणि आत्मनिष्ठ कलावादी दृष्टिकोणामुळे अतिशय नाजूक सर्वसमावेशक बनले आहे. जुन्या लघुनिबंधातील गोष्टी–पाल्हाळ उपदेशकाची किंवा मित्राची

भूमिका जाऊन स्वैर आत्माविष्काराला ललितगद्यात महत्त्व आले आहे. ''निबंधातील वैचारिकतेपेक्षाही लालित्य हा भाषिक गुणधर्म महत्त्वाचा होऊन त्याद्वारे व्यक्त होणारे व्यक्तिमत्त्व केंद्रस्थानी आले आहे.

आजच्या ललित लेखकाला त्याच्या अनुभवविश्वात, जाणिवेच्या पातळीवर, अनुभवाच्या रूपाने लिहिले गेलेले ललितगद्य हे 'मी' ने अधिक वेढलेले असल्याचे दिसून येते. ललित लेखक हे व्यक्तिगत पातळीवर आलेले अनुभव प्रकट करीत ते 'मी' ला शाश्वत रूप देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो 'मी' हा विश्वव्यापी तरीही अप्रकट असा असतो. ललितगद्य वाचताना वाचकाला त्या 'मी' च्या ठिकाणी 'स्वत्व' दिसले पाहिजे. असे लिखाण लेखकाने केलेले असते. ललितगद्य लेखक आपले अनुभव सांगत असतो. या सांगण्याच्या क्रियेला अलीकडे अधिक महत्त्व येवून सांगणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे रंग असंख्य पातळीवरून विविध पध्दतीने लेखनातून आविष्कृत होत आहेत. वाङ्मयातील लालित्य ही शक्ती आज बहुतेक प्रकारच्या लेखनातून या ना त्या स्वरूपात मराठी वाङ्मय समृध्द करीत आहे. त्यामुळेच शास्त्रीय विषयांवर लिहिले गेलेले लेख, रोज प्रसिध्द होणारी वर्तमानपत्रे, यांमधील ललित लेख अशा असंख्य लेखांचा या संदर्भात 'ललित गद्य' प्रकारात समावेश करून ललित गद्य या दृष्टिने त्यांचा विचार करणे आवश्यक झाले आहे.

आजच्या ललित लेखनामध्ये 'मी' ची वेगवेगळी रूपे असतात. 'मी' ला आलेले कौटुंबिक, सामाजिक तसेच निसर्गातील अनुभव देखील प्रकट झालेले असतात. ललितगद्यातील मनाला सर्व पातळ्यांवर जाता येते. ते 'मी' चा मुक्तपणे शोध घेते. ह्या 'मी' चे सहज आलेले अनुभव लेखक मनाचे चिंतन करत असल्याचे आढळते. त्यात मानवी विचार व्यक्त होतात आणि सर्वकालीक वृत्ती आढळतात.

'मी' हा जर ललितगद्य लेखनाचा केंद्रबिंदू मानला तर असे दिसून येते की, वेगवेगळ्या दिशांनी मिळालेले जे विविधांगी अनुभव आहेत त्याचे लेखन स्वरूप भिन्न राहिल.

**ललित लेखनाचे विशेष –**

१. लालित्य हा ललितगद्याचा आत्मा आहे.

२. ललित साहित्य हे भाषेच्या, शब्दांच्या सहाय्याने अविष्कृत होते.

३. नवनिर्मिती ललित साहित्यातून होते.

४. अनुभवाचा आविष्कार ललित साहित्यातून होतो.

५. ललित साहित्यातून लेखकाला आलेले विविध अनुभव व भावना प्रकट होत असतात.

६. ललित साहित्य हे प्रतिमांनी व शैलीने नटवले जाते.

७. ललित साहित्यातून जीवनाचे दर्शन घडते.

८. ललित साहित्यातील प्रत्येक कलाकृती ही स्वयंपूर्ण असते.

९. ललित साहित्यात प्रतिकांचा वापर आशयाला उठावदारपणा देण्यासाठी केलेला असतो.

१०. ललित साहित्य हे आत्मनिष्ठ साहित्य असते.

## १.२ ललित लेखन म्हणजे काय ?

### ललितचा अर्थ

'ललित' म्हणजे विलासी, मनोहर, कोमल, विलास, शृंगार, स्त्रिचे नृत्य.

'ललित' म्हणजे एक वृत्त आहे. याच्या चरणात

११ – अक्षरे असतात.

व, र, ज, स. – गण असून शेवटी लघुगुरू अक्षरे असतात.[१]

ज्यात लालित्यादी गुण मुख्यत्वे असतात, ज्यात कलात्मक सौंदर्याचा आविष्कार प्राधान्याने झालेला असतो, सर्जनशील (Creative) कल्पनाशक्तीला ज्यात पूर्ण वाव/मोकळीक मिळते. अशाच वाङ्मयाला आपण 'साहित्य' म्हणतो. 'ललित वाङ्मय' हा शब्द साहित्य याच अर्थी वापरतात.

लेखन हे एखाद्या व्यक्तीने प्रतिभेचा वापर करून केलेले असावे त्यातून लेखकाला व वाचकाला आनंद मिळाला पाहिजे. अशा लेखनाला 'ललितलेखन' असे म्हणतात.

स्थलकालाची बंधने झुगारून जगातल्या सौंदर्याला हरप्रकारची रूपे देऊन हे कलावंत एक स्वतंत्र सौंदर्य क्षेत्र निर्माण करतात. त्यांनी निर्मिलेल्या या नंदनवनात कोणीही केव्हाही यावे, आणि सौंदर्याचा अनुभव घेऊन आनंदाची मनसोक्त लूट करावी ! हे ललित साहित्याचे वैशिष्ट्य ना. सी. फडके यांनी, साहित्य आणि साहित्यिक या पुस्तकात व्यक्त केले आहे. ललितलेखन म्हणजे आत्मनिष्ठ लेखन होय. मानसशास्त्रीयदृष्ट्या साहित्यात व्यक्त होणारे अनुभव हे व्यापक अर्थाने 'मी' च्या जीवनातीलच असतात. 'मी' ची सुख–दुःखे, जडणघडण, निरीक्षणे, आवडी–निवडी, बालपण, तरूणपण, कर्तेपण, एकूण स्वभाव, त्याला भेटलेल्या माणसांच्या आठवणी, घडलेले प्रसंग इत्यादी सांगण्यासाठी जे लेखन केलेले असते त्यास ललित लेखन असे म्हणतात. लालित्य हा भाषिक गुणधर्म महत्त्वाचा मानून त्याच्या आधाराने लेखकाचे व्यक्तिमत्त्व केंद्रस्थानी आले.

आजच्या ललित लेखनामध्ये 'मी' ची विविध रूपे असतात. 'मी' च्या नकळतेपणापासून ते विविध अनुभव घेतलेल्या 'मी' पर्यंतचे दर्शन आपल्याला ललित लेखनातून होत जाते. वृक्ष, प्राणी, वस्तू, व्यक्ती, जीवनातील विविध स्मृती व अनुभव या

साऱ्यांना ललित लेखनामध्ये जसेच्या तसे प्रकट केले जाते. लेखकाच्या दृष्टीला जग कसे दिसले तसे ते वाचकाच्या नजरेस आणून देण्याचे कार्य ललित लेखन करते.

लेखक आपल्या स्मरणशक्तीच्या जोरावर अनुभव कक्षेच्या मर्यादित जे जे अनुभवले ते फक्त माझे नव्हे तर ते साऱ्या विश्वाचे आहे. ते विश्वापुढे प्रकट झाले पाहिजे या हेतूने साध्या, सरळ व वर्णनात्मक शैलीने लेखक ते वाचकापुढे ठेवत असतो. ललित लेखनामध्ये प्रतिमा, संकेत यांचा वापर केलेला असतो. त्याच्यामध्ये भावमूल्ये असतात. तसेच ते त्या-त्या लेखकाच्या आत्मनिष्ठ शैलीने नटविलेले लेखन असते.

लेखकाने आपल्या मनाच्या जाणिवेच्या व नेणिवेच्या पातळीवर ललित लेखन करून आपले अनुभव वाचकांच्यापुढे प्रकट केलेले असतात. शेवटी ललित-लेखन हे 'मी' च्या अविष्काराचे केंद्र मानले तर वेगवेगळ्या दिशांनी, निरनिराळ्या अनुभवांनी ते लेखनातून व्यक्त होत जाते. अनुभव या संकल्पनेत तीन घटकांचा समावेश होतो. संवेदना, विचार, भावना या ज्ञानेंद्रियांमार्फत बाह्यजगाशी क्रियाप्रतिक्रियात्मक व्यवहार चालू असतात. यातून ज्या संवेदना जाणवतात, त्यांना ऐंद्रिय संवेदना म्हणतात. या संवेदनांचा अर्थ लावला गेल्यानंतर विचार व भावना यांचा जन्म होतो आणि या तिन्ही घटकांच्या एकत्रीकरणातून ललित साहित्य जन्माला येते म्हणजेच -

संवेदना + विचार + भावना = अनुभव

अनुभव + शब्दरूप + कल्पकता = ललित साहित्य होय.

म्हणजेच लेखकाला आलेले अनुभव तो शब्दरूपाचा आधार घेऊन कल्पकतेने वाचकांपुढे मांडतो व त्यातून आनंदप्राप्ती होते ते साहित्य म्हणजेच ललितसाहित्य होय.

**व्याख्या –**

**भीमराव कुलकर्णी** – ''कथा, कादंबरी, नाटक, चरित्रे–आत्मचरित्रे व कविता इत्यादी वाङ्मय प्रकारात न बसणाऱ्या वाङ्.मयाचा समावेश या प्रकारात करण्यात येतो.''[२]

**चंद्रकांत वर्तक** – ''ललित ते असते की, जे एखादे अमूर्त मूर्त करते. ललित ते असते की, जे अमूर्ताला मूर्त करतानाच मनुष्यत्वाच्या मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचे रहस्य उलघडते.''[३]

**आनंद यादव** – ''ललित साहित्याच्या व्याख्येबाबत आनंद यादवांची भूमिका ठाम नसल्याचे दिसते. प्रमुख गद्य प्रकारांव्यतिरिक्त जे लेखन ते ललितगद्य. ही भूमिका जरी त्यांना मान्य नसली तरी ललित लेख, आठवणी, अनुभव, लघुनिबंध यांचा संकर आणि संग्रहात पुष्कळवेळा एकत्रीकरण झाले आहे. हे तिन्ही उपप्रकार काही निकष लावून काढता येणे शक्य नसले तरी ते एकमेकांना घनिष्ठ आहेत, जवळचे आहेत. याची जाणीव शिल्लक राहतेच असे आनंद यादवांना वाटते.''[४]

**वसंत आबाजी डहाके** – ''डहाकेंच्या मते, 'ललित गद्यात काव्यात्मकता असते, वैचारिकता असते. कधी एखाद्या कथेच्या जवळपास ललितलेख गेलेला असतो, कधी विनोदाची निर्मिती झालेली असते. तर कधी भाव–भावनांची अभिव्यक्ती साधलेली असते. ''[५]

ललित गद्याच्या व्याख्येचा आढावा घेणे तसे कठीण काम आहे. कारण, नाटक, कथा, कादंबरी किंवा काव्य या साहित्य प्रकारांची गुंतागुंत कमी आहे. ललित गद्यात अनेक उपप्रकारांचा समावेश होतो. त्यामुळे ललित गद्याची व्याख्या किंवा मते मांडताना अडखळल्यासारखे होते. ललित साहित्यात वृत्तांत, स्थलवर्णन किंवा मनोरंजक माहिती देण्याचा उद्देश नसतो. ललितलेखक हा घटना, स्थल, अनुभव, समाज याच्याशी एकरूप होऊन लेखन करीत असतो. ललित साहित्यातला 'मी' हा कलात्मक पातळीवरचा असतो.

अस्सल ललित वाङ्मयीन कृतीमध्ये मनुष्याच्या स्वभावातील मूळ प्रवृत्तींचे दर्शन, दिसणाऱ्या वस्तूंच्या निरनिराळ्या संगती, विसंगती व त्यांचा अर्थ लावण्याची प्रभावी संगती असते. मनुष्य हा सतत स्वतःचा विकास घडवून आणण्याच्या प्रयत्नात असतो. पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या स्थितीतून, राखेतून, शून्यातून विश्व निर्माण करण्याच्या भावनेतून येणाऱ्या अनुभवाचा उदंडपणा लेखक आपल्या लिखाणातून व्यक्त करीत असतो. ललित वाङ्मय मनुष्याच्या मनुष्यत्वाचा शोध घेत असते. ललित वाङ्मयामध्ये लेखकाचे व्यक्तिमत्त्व हे विशिष्ट व्यक्ती म्हणून न येता विषयाच्या, कल्पनेच्या माध्यमातून डोकावत असते.

अरुणा ढेरे यांच्या मते, 'ललित मधील अनुभव हे चिमटीने उचलावयाचे असतात. संवेदना ताज्या ठेवून, आलेले अनुभव गढूळ न होऊ देता, जीवनाकडे पाहण्याचा चांगला दृष्टिकोण निर्माण करणारे ललित लेखन असावे.

ललित वाङ्मयाच्या व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपणांस असे जाणवते की, सर्व लेखकांच्या व्याख्या एकाच प्रवाहात येऊन मिळतात. ललित साहित्यात चिंतनात्मकता, वास्तवता, आशावाद, निराशावाद, काव्यात्मकता, वैचारिकता, लालित्य इ. गुणवैशिष्ट्ये आपणांस पहावयास मिळतात. लेखकांना आलेले अनुभव त्याच्यामागे असणारी कारणे व नंतर झालेले परिणाम इथपर्यंतचा प्रवास लेखनात आलेला असतो.

प्रभाकर पाध्ये यांनी ललित साहित्याच्या व्याख्येबाबत मांडलेले मत योग्य वाटते.

कल्पित आणि सत्य यांचे रसायन कल्पित म्हणजेच सत्याचेच उदात्तीकरण. हे कल्पित म्हणजेच लेखकाने वैचारिकता, आत्मचिंतन, लालित्य यांच्या सहाय्याने सत्याला दिलेला आकार असतो. अशा मिश्रणातूनच ललित साहित्याची निर्मिती होत असते.

चंद्रकांत वर्तकांनी देखील ललित साहित्याच्या व्याख्येबद्दल अतिशय चांगले मत मांडले आहे. लेखकाने घेतलेला अनुभव हा अमूर्तच असतो. पूर्वी तो कधी न घेतलेला असतो. या प्रथमच घेतलेल्या अनुभवाला लेखनीच्या रूपाने मूर्त बनविण्याचे काम केले जाते. त्या वास्तव अनुभवातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे तसेच व्यक्ती प्रवृत्तीचे रहस्य उलघडते.

वरील व्याख्यांचा परामर्श घेतल्यानंतर ललितगद्य वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकाराहून वेगळा आहे हे जाणवल्यावाचून रहात नाही. स्वातंत्र्योत्तर काळात या प्रकाराकडे एक नवा वाङ्मय प्रकार म्हणून पाहिले जाते.

**१.३ लघुनिबंध :–**

अनेकविध विषयांवर वैचारिक व गंभीरपणे व सुसूत्ररीतीने आपले विचार व्यक्त करणाऱ्या निबंधाला १९२५ नंतर आत्मनिष्ठेचा बुरखा घेणारे स्वैर वैचारिक लेखन असे स्वरूप प्राप्त होत गेले. या नव्या वळणालाच लघुनिबंध, गुजगोष्ट, ललित निबंध आणि आज 'ललित गद्य' अशा नावाने संबोधले जाऊ लागले.

"लघुनिबंध हा ललित गद्याचा एक उपप्रकार होय. १९२६–२७ च्या आसपास वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांनी तो मराठी साहित्यात इंग्रजीतून आणला, असे मानले जाते. विचारनिष्ठ व वस्तुनिष्ठ या अंगाने निबंध विकसित होत गेला व लघुनिबंधामध्ये व्यक्तिमत्त्वाला, व्यक्तीच्या अनुभवांना प्राधान्य मिळत गेले. व त्यात अनुभवआविष्काराला महत्त्व मिळाले. शेवटी तो ललित गद्याचा एक प्रकार झाला."[६]

मराठी निबंधाचा विकास क्रमा–क्रमाने होत गेला. १९७० पूर्वीचा प्राथमिक निबंध नंतर चिपळूणकरी वळणाचा निबंध, परांजपे वळणाचा ललितगुणयुक्त निबंध व त्याच

काळातील लहान–मोठे स्फूट ललित लेख या टप्प्यानंतर चौथा टप्पा म्हणजे, केळकरी वळणाचा प्रसन्न शैलीचा ललितगुणयुक्त निबंध व पाचवा टप्पा म्हणजेच लघुनिबंध होय.

जानेवारी १९३१ मध्ये, प्रसिध्द झालेला 'पाऊस' किंवा त्यानंतरचा 'हरवली म्हणून सापडली' यासारखा लघुनिबंध हा फडके यांचा खराखुरा लघुनिबंध मानता येतो. म्हणून पुढे त्यांनी अशा अनेक गुजगोष्टी लिहिल्या.

ना. सी. फडके, वि. स. खांडेकर आणि अनंत काणेकर या तीन प्रमुख लघुनिबंधकारांच्या लेखनाचा प्रभाव मराठी लघुनिबंधावर असलेला दिसतो. त्यांच्या लेखनाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, फडके यांनी रोजच्या मध्यमवर्गीय सामान्य जीवनातील सौंदर्य, लेखनातून टिपले आहे. खांडेकर यांनी जीवनविषयक चिंतनाचे प्रकटीकरण केले आहे. तर, अनंत काणेकर यांनी समाजविषयक ठाम स्वरूपाचे मार्क्सवादाला जवळचे विचार स्विकारले.

एक 'हलका–फुलका साहित्य प्रकार' म्हणून लघुनिबंधाकडे पाहिले गेले. त्यामुळे चिंतनाची जोड लघुनिबंधाला मिळाली नाही व तो साहित्य प्रकार अधोगतीला गेला.

त्याच काळामध्ये कुसुमावती देशपांडे, गं. बा. सरदार, ना. मा. संत आणि इरावती कर्वे यांनी काही उत्तम लघुनिबंध समाजाला दिले.

**कुसुमावती देशपांडे** यांचे 'दीपदान' (१९४१) मधील 'मध्यान्ह' व 'मध्यरात्र' आणि 'मोळी' (१९४६) मधील 'चंद्रास्त' असे हे तीन लघुनिबंध, वैयक्तिक आवडी–निवडी सांगणे म्हणजे 'मी' चा अविष्कार नसून तो 'मी' व्यापक पातळीवर कसा नेता येईल, हे त्यांच्या लघुनिबंधातून प्रथमच प्रत्ययाला येते.

**ना. मा. संत** 'उघडे लिफाफे' (१९४४) यामध्ये त्यांनी फडके पध्दतीच्या आत्मनिवेदनशील लघुनिबंधाचे निखळ रूप शोधण्याचा प्रयत्न केला. लघुनिबंधाला त्यांनी अधिक सच्चे, घरगुती स्वरूप दिले. घराच्या सजवलेल्या दिवाणखाण्यातून त्यांनी स्वयंपाकघरात आत्मनिवेदनशीलता नेली. व्यक्तिमत्त्वाचा प्रांजळ अविष्कार केला. तंत्र नाकारून मांडणीत सरळपणा स्वीकारला. भाषेतील नटवेपणा सोडून तिला मन:पूर्वकता आणली. त्यामुळे त्यांनी फडके पध्दतीच्या लघुनिबंधाला नितळ, सौम्य आणि हृदयक्रांती प्राप्त करून दिली.

**इरावती कर्वे** 'परिपूर्ती' (१९४९), 'भोवरा' (१९६०), 'गंगाजळ' (१९७२) कर्वे यांच्या लघुनिबंधामध्ये जुन्यातून यशस्वीपणे बाहेर पडणे व नवे यशस्वीपणे आत्मसात करणे हे विशेष आढळतात.

लघुनिबंधाला स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ललित निबंध, ललित गद्य, ललित लेख, आत्मनिष्ठपर लेख अशी नावे प्राप्त होत गेली.

**ललित गद्य :**

पारतंत्र्याच्या काळामध्ये 'स्वातंत्र्य मिळवणे' हाच एकमेव ध्यास होता आणि सर्व मन:शक्ती त्याच दिशेने कार्य करीत होत्या. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर साहित्यिक मने ही स्वत:कडे वळली. जीवनसौंदर्य मुक्तपणे, स्वतंत्रपणे चाखायला प्रवृत्त झाली आणि त्यातूनच लघुनिबंधाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

न. वि. गाडगीळ, गो. वि. करंदीकर, दुर्गा भागवत यांचे लघुनिबंध हे चाकोरीबरोबर जाऊन त्यांनी स्वतंत्रपणे व नवे रूप दिले. त्यालाच आपण 'ललित गद्य' मानू लागलो.

**न. वि. गाडगीळ** यांची 'सालगुदस्त' (१९४७) 'अनगड मोती' (१९५५), 'स्मृतिशेष' (१९५८), 'पाव आणि मिसळ' (१९६३) ही पुस्तके आठवणी व अनुभवांवर आधारित ललित गद्याचा उत्कृष्ट नमूना आहेत.

**गो. वि. करंदीकर** यांचे 'स्पर्शाची पालवी' व 'आकाशाचा अर्थ' हे (१९५९) व (१९६५) मध्ये प्रसिध्द झालेले ललितगद्य संग्रह होत. गो. वि. करंदीकरांनी जुन्या लघुनिबंधाला चाचपून पाहिले, त्यातील उपऱ्या गोष्टी नाकारल्या व मूळ रूप, मूळ प्रयोजन शोधून लेखन केलेले दिसून येते.

**दुर्गा भागवत** 'ऋतुचक्र' (१९५६), 'भावमुद्रा' (१९६०), 'व्यासपर्व' (१९६२) 'रूपरंग' (१९६७), 'पैस' (१९७०) भागवत यांचे लेखन लयबध्द, अनुभवचिंतनावर आधारित असलेले दिसून येते. त्यांनी कोणत्याही साहित्य प्रकाराला शरण न जाता मुक्त ललितलेखन केलेले आहे. 'कवितेप्रमाणे ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते. किंबहुना भाववृत्ती नसेल तर, सृजनाचा अंकुर उगवणारच नाही.' असे त्या 'पैस' मधील 'स्वच्छंद' प्रस्तावनेत म्हणतात. ते त्यांच्या ललित लेखांबाबत खरे आहे.

१९५६ मध्ये **मंगेश पाडगांवकर** यांच्या 'निंबोणीच्या झाडामागे' हा लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध झाला. पाडगांवकरांचे कविमनच लघुनिबंधात कार्य करत असल्याचे दिसते. निसर्गाचे साधे वर्णन करतानाही त्यांच्या भाषेत अमाप प्रतिमा आलेल्या आहेत. त्यांच्या लघुनिबंधात विचार चिंतन येत असले तरी ते उत्कृष्ठ दर्जाचे असते. सामान्यांच्या थोडेसे वरच्या पातळीवरचे असते.

**माधव आचवल** यांचे 'किमया' (१९६१) हे पुस्तक. यामध्ये त्यांनी वास्तुकलेसंबंधी स्वत:ला आलेल्या अनुभवांची सौंदर्यात्मक वर्णने अलगद व हळुवारपणे केलेली आहेत.

ललित गद्य हा स्वैर–मुक्तलेखन–प्रकार वाटत असला, तरी हेतुरहित विस्कळीतपणा हा त्याला मारक ठरतो. कारण, जीवनाचे संवादी, एकात्म आकलन उमटविण्यात तो दिशाहीनतेमुळे मारक ठरतो. केवळ मंतरलेल्या किंवा भारलेल्या वृत्तीमुळे लेखन विषयाचा मर्मभेद करू शकत नाही. ललित गद्य लेखनामध्ये हळूहळू सामाजिक जीवनाचा समावेश होत गेला. फक्त जीवनात आलेले अनुभव दर्शन घडविणे, एवढीच प्रतिमा करून खूप मोठ्या प्रमाणात लेखन केले गेले.

**मुक्तगद्य किंवा ललितलेखन**

ललितलेख व लघुनिबंध यांच्या सीमारेषा मुळातच एकमेकीला भिडलेल्या आहेत. इरावती कर्वे, दुर्गा भागवत यांच्या संग्रहात अशा प्रकारचे अनेक लेख किंवा लघुनिबंध आपल्याला आढळून येतात.

''श्रीनिवास कुलकर्णी यांचे 'डोह' हे पुस्तक (१९६५) साली प्रसिध्द झाले. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या 'मी' च्या बालपणीच्या गावचा परिसर त्यांच्या लेखनाचा विषय झालेला आहे. बालमनाला जवळच्या वाटणाऱ्या घटना, वस्तू, पक्षी, स्थळे, वृक्ष, राने हे विषय या लेखनात आलेले आहेत. बालमनाच्या दृष्टीतून लेखकाने निसर्ग अनुभवलेला आहे. या पुस्तकातील प्रत्येक गोष्ट वाचकाच्या मनासमोर दिसत आहे, घडत आहे असे वाटते; इतक्या हुबेहुब पद्धतीने कुलकर्णी यांनी लेखन केलेले आहे.''[७]

''कुलकर्णी यांच्या लेखनाने इतकी विविध रूपे घेतलेली आपल्याला दिसतात की, त्याचे अमुक एका वाङ्.मय प्रकारात वर्गीकरण करणे कठीण आहे. एकाच वेळी ललित निबंध, आत्मचरित्र, आठवणी, स्मरणे, चिंतन, स्थलवर्णन अशी अनेक रूपे त्यांचे लिखाण घेते. आणि कुठल्याही एका प्रकाराला व्यापून परत ते जसेच्या तसे उरते,'' असे डॉ. प्रल्हाद वडेर 'डोह' च्या ललितगद्याबद्दल म्हणतात.

डोहमध्ये माणसे, पशु, पक्षी आणि निसर्ग या सर्वांनाच डोहाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. दादा, थोरलीआई, वानरे, सुसरी, गिधाडे, वटवाघुळे, ऊन, वारा, घुबडे आणि पाणी यांना स्थान असले तरी लेखकाचे बालजग हेच 'डोह' चे मध्यवर्ती केंद्र आहे.

एकाचवेळी ते भूतकाळ आणि वर्तमानकाळ या दोन पातळ्यांवर लिहितात. त्यांना आलेल्या विविध अनुभवांचा अविष्कार त्यांच्या लेखनातून दिसून येतो. त्यामुळे अनुभवांना समूर्तता, सघनता, सूचकता प्राप्त होते. त्यांना विविध भावावस्था प्राप्त होतात. ते अनुभवही शुध्द आणि निखळ स्वरूपात व्यक्त करतात. 'डोह' चा आस्वाद हा वाचनीय आहे.

'सोन्याचा पिंपळ' हे त्यांचे दुसरे पुस्तक १९७५ साली प्रसिध्द झाले. आनंद यादवांच्या मते, 'सौन्याचा पिंपळ' मध्ये एका हिंदू-तीव्र बालमनाची संवेदना प्रकट झाली आहे. या संवेदनेच्या पातळीवर वाचक कितपत पोहोचेल याबद्दल मात्र शंका वाटते. '[८]

**व्यंकटेश माडगूळकर** यांचे 'पांढऱ्यावर काळे' हे पुस्तक (१९७१) साली प्रसिध्द झाले. प्राणीजीवन, कुटुंबजीवन यांच्यामध्ये येणारे 'मी' चे अनुभव त्यांनी एकत्र मांडले आहेत. स्वत:ला आलेल्या अनुभवांचा आस्वाद घेत असतानाच आत्मनिष्ठेचा ठसा उमटविण्याची कविवृत्ती असावी लागते. ती त्यांच्या लेखनात आढळून येत नाही. म्हणून ते ललित गद्य म्हणून परिणामकारक वाटत नाही.

**सरोजिनी वैद्य** यांचा 'चिवारीची फुले' (१९७८) हा लघुनिबंधसंग्रह. देशोदेशीचे अनुभव त्यांच्या लेखात एकत्र येतात. आणि अनुभवांनी समृध्द असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवितात. संस्कृतीचा अनुभव घेणारे, महान व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वाने आकृष्ट होणारे, चिंतनशील, भावप्रधान, निरनिराळ्या शहरांचा, प्रदेशांचा अनुभव घेणारे एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व प्रकट होते.

**ग. दि. माडगूळकरांचे** (१९६२) साली प्रसिध्द झालेले 'मंतरलेले दिवस' या पुस्तकाचे नाव येथे घेणे आवश्यकच आहे. गीते, चित्रपटकथा आणि स्वतंत्रपणे काव्यनिर्मिती करणारे कवी म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व उठावदार आहे. पण, ललितगद्य लेखनात त्यांचा तितकासा चांगला ठसा उमटलेला नाही.

स्वातंत्र्यपूर्व ग्रामीण जीवन त्यामधून प्रकटलेली सांस्कृतिक मूल्ये यांच्याकडे सदैव भावूकतेने पाहण्याच्या त्यांच्या श्रध्दाळू वृत्तीमुळे व त्या मूल्यांची बुध्दिमत्तेच्या जोरावर चिकित्सा करण्याच्या अभावामुळे ते लेखन काहीसे स्वप्नाळू आणि पूर्वीचे सर्व काही हरवलेले असे वाटते. केवळ मंतरलेल्या किंवा भारलेल्या वृत्तीमुळे लेखन विषयाचा मर्मभेद करू शकत नाही.

चंद्रकुमार नलगे यांचे 'गावाकडची माती' (१९८५) हे पुस्तक. अगदी अंत:करणपूर्वक तन्मयतेने तेथील चालीरिती आणि माती हीच संस्कृती एवढे मर्यादित विश्व मानून जन्मभर त्या मातीत कष्ट करणारा, रमणारा आणि शेवटी तिच्यातच विलीन होणारा कष्टकरी शेतकरी समाज यांची विलक्षण ओढ यातील 'मी' ला आहे. निसर्गाच्या विविध अवस्थांना भावनात्मक आवेगाने टिपणारे हे लेखन ग्रामीण जीवनातील बालमनाचे रूप आणि मराठी ललितगद्यात मोलाची भर टाकणारे वाटते.

याचबरोबर **अनंतराव पाटील** यांचे 'झडीचे दिवस' (१९८१), **अनिल अवचटांची** 'माणसं', **द. ता. भोसले** यांचे 'पार आणि शिवार' **यादवांचे** 'पान भवरे' (१९८२), स्पर्शकमळे (१९७८).

१९४७ ते १९८५ या काळात पुष्कळ ललित गद्य लेखन झालेले दिसून येते. १९४७ ते ७० पर्यंतचे ललित निबंध हे समर्थ कविमनाने घडविलेले दिसून येतात. तर, १९७० ते १९८५ मधील महत्त्वाचा ललित निबंध गद्य प्रकृतीच्या सामाजिक जाणिवेने आणि वास्तव जीवन दर्शनाने घडविलेला आहे, असे दिसून येते.

वास्तवता हे समाजातील विविध स्तरांवरील विविध घटकांमध्ये दिसून येते. या काळात मध्यमवर्गीय जीवनातील अनेक भल्या-बुऱ्या आठवणी-अनुभवांचे चित्रण आलेले आहे. स्वातंत्र्योत्तर ललित लेखन हे विविध उपप्रकारांनी समृध्द झाले. तसेच ते उपप्रकारांचे अंतर्गत मिश्रण होऊन एकजिवीकरण होऊनही अनेक वेगवेगळ्या रूपांत निर्माण झालेले आपल्याला दिसून येते. ललित गद्याच्या स्वैर व मुक्त वृत्तीमुळे प्रत्यक्षपणे जीवनाला भिडण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ विशेष आहे असे वाटते. आणि हे सामर्थ्य अंगी असलेले लेखक जन्माला यावे लागतात.

**१.४ प्रवास वर्णन :-**

प्रत्येक स्थळाचे त्या त्या ठराविक प्रदेशाचे आपले स्वतःचे असे काहीतरी निराळे वैशिष्ट्य असते, व्यक्तिमत्त्व असते. ते अचूकपणे पकडून वाचकांना त्याचे हुबेहूब दर्शन घडविण्याचे काम प्रवासवर्णनकाराचे असते.

प्रवासवर्णन हे व्यक्तिपरत्वे बदलत असते. एखादी सुंदर इमारत किंवा व्यक्तिविषयी जर 'अ' आणि 'ब' या दोन व्यक्तिंनी आपले मत सांगितले तर, 'अ' व्यक्तीला

त्या वास्तू किंवा व्यक्तीमध्ये आढळलेल्या गोष्टी 'ब' या व्यक्तीला आढळतीलच असे नाही. जशी दृष्टी तशी सृष्टी या न्यायाने 'अ' ला ती वास्तू किंवा वस्तू सुंदर वाटेल पण, 'ब' ला कदाचित ती तितकीशी सुंदर वाटणारही नाही. प्रत्येकाचा एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो. त्यामुळे 'अ' आणि 'ब' या दोन्ही व्यक्तिंनी केलेली वर्णने किंवा लेखन वेगवेगळे असल्याचे आपल्याला दिसून येईल.

प्रवासलेखामध्ये 'मी' त्व आणि विषय वस्तू या दोहोंनाही समान महत्त्व असते. 'मी' त्व हे विषय–वस्तूशी बांधले गेलेले असते. प्रवासात आलेल्या स्थळ, गाव, प्रदेश विषयक अनुभवासंबंधीच लेखक, 'मी' ला सांगावयाचे असते. त्या अनुभवांबाहेर तो जाऊ शकत नाही.

''प्रवासवर्णन हे आत्मनिवेदनपर असले तरी प्रत्यक्षच माहितीचा, केवळ वस्तूनिष्ठ दर्शनाचा भाग असणे अगदी अपरिहार्य आहे. या अललितात लालित्य निर्माण करण्याची शक्ती काही प्रवास लेखकांत नि:संशय आढळते.''

**वा. ल. कुलकर्णी** – ''साहित्य आणि समीक्षा' (१९६२) प्रवास वर्णनामध्ये बऱ्याचदा 'मी' चे अधिक येणे घडते. किंवा काही वेळेला 'मी' हा भावनिक होऊन लेखन करीत असतो.''[१]

**'माझा प्रवास' – विष्णू भटजी गोडसे**

प्रवास वर्णनाची सुरूवात खऱ्या अर्थाने विष्णू भटजींच्या 'माझा प्रवास' (१९८३) या प्रवासवर्णनाने केली. हे प्रवासवर्णन ललित साहित्याच्या पाया भरणीतील महत्त्वाचे प्रवासवर्णन मानले जाते. विष्णूभट हे भिक्षुक होते. लेखक म्हणून त्यांनी प्रवासवर्णन लिहिलेले नाही तर, कर्जाचा बोझा कमी होण्यासाठी गोडसे भटजींनी प्रवास केला होता व

प्रवासातील अनुभव, घटना ते सातत्याने इतरांना सांगत असत त्यामुळे त्यांच्या डोळ्यासमोर त्या घटना, अनुभवरूपाने कायम राहिल्या.

गोडसे भटजींनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना, गावांना भेटी दिल्या. उदा. सातपुड्यातील प्रवास, इंदोर, उजैन, धार, ग्वाल्हेर, महू, ब्रम्हावर्त, गोमंती, गंगा, झाशी, वरसई इ. ठिकाणचे वर्णन ते आपल्या प्रवास वर्णनात करतात.

त्यांच्या प्रवासामध्ये त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्तिंचे सूक्ष्म निरीक्षण ते आपल्या प्रवासवर्णनात करतात. झाशीच्या राणीचा पुरूषी व स्त्रिप्रधान वेश, हळवेपणा, लढाईतील चातुर्य इत्यादीगोष्टींचे वर्णन भटजी मोठ्या भावुकपणे करतात .

न. र. फाटक आपल्या संपादित आवृत्तीत म्हणतात, ''विष्णू भटजीच्या कथनशैलीचे महत्त्व भटजींना आलेल्या अनुभवांच्या वैचित्र्यावर अवलंबून आहे. ते वैचित्र्य वाचकाला आकर्षित करते. मानसशास्त्राला उपयोगी पडणारे अनुभव जसे विष्णू भटजींच्या लेखनात पुष्कळ आहेत, तसे त्या वेळच्या सामाजिक स्थितीच्या ज्ञानालाही उपयोगी पडणारे आहेत.'

गोडसे भटजी यांनी आपल्या प्रवास वर्णनात साधी, सोपी, भाषाशैली, अलंकार, उपमा, वाक्प्रचार यांचा वापर केलेला आहे. त्यांच्या लेखनामध्ये कोठेही भारदस्तपणा नाही. वास्तवता, आशयघनता इत्यादी ललित साहित्याचे गुण त्यांच्या लेखनात आढळतात.

'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' – अनंत काणेकर

(१९४०) हे प्रवासवर्णन प्रकाशित झाले. यापूर्वी ते 'किर्लोस्कर' मासिकातून (१९३७) प्रसिध्द होत होते. इंग्लंडचे सहावे जॉर्ज यांच्या राज्यरोहन समारंभाच्या वेळी

बोटीच्या कंपनीने परतीच्या प्रवासाचे सवलतीचे तिकिट ठेवल्यामुळे ते इंग्लंड व रशियाचा प्रवास करू शकले होते.

काणेकरांच्या प्रवासात त्यांना ज्या व्यक्ती भेटल्या, निसर्ग पाहिला त्याच्याशी ते एकरूप झाले. प्रवास वर्णनाबाबत काणेकर म्हणतात, ''प्रवासात वेगळी माणसे भेटतात आणि त्यांच्याबद्दल सांगता सांगता प्रवासवर्णन साकार होते. ही माणसे पूर्वी कधी न भेटलेली, पूर्णपणे अनोळखी पुढेही कधी न भेटणारी आणि प्रवासात ओळख होवून अनोळखी राहणारी अशी असतात.''[१०]

लालित्यपूर्ण भाषा, उपमा, नवनिर्मिती, घटनांशी एकरूपता, निसर्गसौंदर्य, कल्पकता इ. कारणांनी काणेकरांचे लेखन ललित लेखन ठरते.

**'वाटचाल' – रा. भि. जोशी** (१९५३) 'दिल्ली एक अजबघर' (ऑक्टो १९४०), 'शरावती' (मार्च १९५३), 'हरिद्वार', 'ऋषिकेश' (१९४२), 'गाड्ंवार वारि मनोहारि' (१९५०), 'पळसाची फुले' (१९४९) अशा लेखनातून जोशींचे 'वाटचाल' हे प्रवासवर्णन साकारलेले आहे.

जोश्यांचे हे उत्तर भारतातील प्रवासवर्णन वाचकांना मंत्रमुग्ध करेल असा त्यांना विश्वास वाटतो. त्यांनी बऱ्याच दिवसांनी प्रवासवर्णन केलेले असले तरी प्रवासातील व्यक्तिरेखा, सौंदर्य, घटना, नाविन्य, निसर्ग यांचे चित्रण करण्यास ते विसरत नाहीत.

शांता शेळके जोशींच्या प्रवासवर्णनासंबंधी मत मांडताना म्हणतात की, 'जोश्यांचा प्रवास हा सहजगत्या किंवा अपघाताने घडलेला नसून त्याच्यामध्ये सहेतुकता आहे. सांस्कृतिक किंवा सामाजिकदृष्ट्या महत्त्व नसलेले एकही स्थळ त्यात भेटत नाही.

त्यामुळे अनुभवातून प्रवास लेख निर्माण होण्याऐवजी लेखनासाठी अनुभव गोळा केले जात आहेत.''

**'साता समुद्रापलीकडे' – गंगाधर गाडगीळ**

गंगाधर गाडगीळ यांनी 'गोपुराच्या प्रदेशात' (१९५२) आणि 'साता समुद्रापलीकडे' (१९५९) ही दोन प्रवासवर्णने लिहिली आहेत. 'गोपुराच्या प्रदेशात' प्रवासवर्णनात लेखक दक्षिण भारतातील मोठमोठी गोपुरे व दक्षिण भारतीय संस्कृतीचे चित्रण करतात. तर, 'साता समुद्रापलीकडे' या प्रवास वर्णनात युरोपातील घटना, प्रसंग विनोदी पध्दतीने लेखकाने सांगितल्या आहेत.

पाण्यावर तरंगणाऱ्या बोटीची तुलना गाडगीळ पानाशी करतात. वृक्षाचे पान ज्या पध्दतीने पाण्यावर पडल्यानंतर त्याचा प्रवास हा होतोही किंवा नाहीपण त्याच पध्दतीने अथांग समुद्र असल्याकारणाने बोटीचा प्रवास झाला तरी लेखकाला चोहोबाजूस पाणीच दिसत असते. त्यामुळे बोट केवळ पाण्यावर तरंगते आहे. असा भास लेखकाला होतो.

गाडगीळ या प्रवासवर्णनात नैसर्गिक साधन संपत्तीचा आधार घेऊन आपले व वाचकांचे मन अनुभवाशी एकरूप करण्याचा प्रयत्न करतात. विनोदबुद्धी, कल्पकता, उत्कंठा, पुर्ण प्रसंग, तुलनात्मक दृष्टिकोण साता समुद्रातून दिसून येतो.

**'अपूर्वाई' – पु. ल. देशपांडे**

''अपूर्वाई' मध्ये पु. लं. ची प्रखर वैचारिक भूमिका, भारतीय संस्कृती, आदर्श, कला, वाङ्.मय, समाज, राजकारण यांचे सूक्ष्मरित्या केलेले निरीक्षण आहे.

प्रा. भिमराव कुलकर्णी 'ललित गद्य' या लेखात 'पु. ल. देशपांडे यांची जातकुळी कोल्हटकर गडकऱ्यांची आहे. असे म्हणताना त्यांची वृत्ती गडकऱ्यांची आणि लेखणी कोल्हटकरांची आहे.' असे म्हणतात.''[११]

केंब्रिजचे महत्त्व सांगताना लेखक म्हणतो की, 'पंढरीच्या यात्रेला गेल्यानंतर मंगळवेढ्याला जावे लागते.... गयेला गेल्यानंतर प्रयागला जावे लागते. तसेच लंडनला गेल्यावर ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठात जावे लागते. पु. ल. आपल्या प्रवासवर्णनात पॅरिसवर्णन मोठ्या ठुमासदारपणे करतात, 'पॅरिसचा दिवसा एक मूड तर रात्रीचा वेगळा मूड असतो.' रात्रीचे पॅरिस आधी पाहिले तर दिवसाचे पॅरिस त्याच लोकांनी निर्माण केले का ? अशी शंका येते.[१२]

आपल्या विनोदी, तिखट, वैचारिक, मिश्किल कल्पकतेने युरोपीय देशातील माणसे, निसर्ग सौंदर्य, भाषा, तेथील संस्कृती, आदर्श साधन संपत्ती यांचे सूक्ष्मरित्या, डोळसपणे पु. ल. देशपांडे निरीक्षण करतात व अपूर्वाईत उतरवितात.

**प्रभाकर पाध्ये – 'तोकोनामा'**

'तोकोनामा' (१९६१) या प्रवासवर्णनात 'जपान' या देशाचे प्रवासवर्णन आले आहे. 'तोकोनामा' हे प्रवासवर्णनाला नाव देण्यामागे जपानी संस्कृती डोकावते आहे. जपानी लोकांच्या घरामध्ये आगत–स्वागतच्या जागेत कोनाकडे भिंतीला एखादा लांबरूंद कोनाड्यासारखा भासणारा एक भाग असतो त्यात खाली एका चौरंगावर अगर पाटावर एक पुष्पपात्र असते. पुष्प पात्राच्या मागे भिंतीला त्या ऋतुला योग्य असे निसर्गचित्र अगर चित्ररूप काव्यचरण टांगलेला असतो. त्या भागाला 'तोकोनामा' म्हणतात.

भीमराव कुलकर्णी प्रभाकर पाध्यांविषयी मत मांडताना म्हणतात, ''पाध्ये हे जातीवंत पत्रकार आहेत. तसेच निसर्गवेडे गृहस्थ आहेत. साहित्य, राजकारण व कला यांच्याबद्दल उत्कट जाणिवेतून त्यांचे हे सारे लेखन झाले आहे. ''[१३]

जपानच्या दर्शनाने पाध्ये भारावुन जातात. तेथील संस्कृती, निसर्गरम्य ठिकाणे, पाध्यांना आकर्षित करतात. जपानचे सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन क्षेत्राचे पाध्ये कलात्मकतेने वर्णन करतात.

प्रवासवर्णनात गोविंद बाबाजी जोशींचे 'रायगड किल्ल्याचे वर्णन' (१८८५), लक्ष्मणराव माने 'नैनितालचा प्रवास' (१९०१), गोखले रामचंद्र जनार्दन 'माझा मुंबईचा प्रवास' (१९२१), काका कालेलकर 'ब्रम्हदेशचा प्रवास' (१९८३), ज. पा. देशमुख 'युद्ध भूमीवर' (१९४६), न. र. फाटक, 'रशियाचे संक्षिप्त दर्शन' (१९५५), प्र. के. अत्रे, 'भ्रमंती' (१९५६), वसंत बापट, 'बारा गावचं पाणी' (१९६६) रमेश मंत्री 'सुखाच्या रात्री' वगैरे प्रवासलेखन मराठीमध्ये झालेले आहे. सर्वच प्रवासवर्णने ललित असतात असे नाही. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रवासवर्णने अवलंबून असतात. काही निवडकच प्रवासवर्णनांचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे.

## १.५ 'मी' चा आविष्कार :-

'मी' च्या अनुभवांचे दीर्घलेखन हे ललित साहित्याच्या अभ्यासातील एक घटक होय. 'मी' ने जे भोगले, अनुभवले, पाहिले असे लेखन, काही लेखक मंडळी तळमळीने, जिव्हाळ्याने कल्पकतेने वाचकांच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करतात. 'मी' च्या अनुभवांचे दीर्घलेखन एक आत्मकथा किंवा छोट्याशा प्रवासाच्या स्वरूपाचे असते. 'मी' चा अविष्कार, 'मी' च्या अनुभवांचा सामाजिक घटक पुढे येतो. ललित गद्यात आत्मनिष्ठ लेखन

असते आणि मानसशास्त्रीयदृष्ट्या साहित्यात व्यक्त होणारे अनुभव हे 'मी' च्या जीवनातीलच असतात. 'मी' ची सुखदु:खे, जडण–घडण, निरीक्षणे, आवडी–निवडी, बालपण, तरूणपण, कर्तेपण, एकूण स्वभाव, त्याला भेटलेल्या माणसांच्या आठवणी, घडलेले प्रसंग इत्यादी सांगण्यासाठीच 'मी' च्या 'आठवणी–अनुभव' अवतरत असतात. 'मी' च्या व्यक्तिमत्त्वाच्या अविष्काराची साधने म्हणून त्या आलेल्या असतात. 'मी' च्या व्यक्तिविशेषांचा इथे अविष्कार किंवा शोध असतो. 'मी' हा स्वत:ला येणाऱ्या अनुभवांच्या आधारे स्वत:च्या मानसिक, शारीरिक व प्रत्यक्ष वर्तनातील सुसंगती शोधत असतो.

'मी' ला स्वत:विषयी एक आत्मीयता असते. ह्या आत्मीय भावनेने स्वत:विषयीच केलेले गाणे स्वत:शी गुणगुणणे म्हणजे ललित गद्यलेखन असते. शेवटी साहित्यिकाला आलेला अनुभव हा अंतिमत: 'मी' चा अनुभवच असतो.

'मी' च्या अविष्कारामध्ये, 'मी' च्या लेखनामध्ये वि. स. खांडेकर, शीलावतीबाई केतकर, लक्ष्मण माने, दिलीप शिंदे, डॉ. कुमार सप्तर्षी इत्यादी लेखकांचा या लेखनात उल्लेख करावा लागतो.

वि. स. खांडेकर यांनी 'एका पानाची कहाणी' मध्ये कोकणातील बालपण, शिक्षकी पेशातील अनुभव तन्मयतेने व जिव्हाळ्याने चित्रित केले आहेत. खांडेकरांच्या लेखनातून त्यांना बालपणापासून ते तारूण्यापर्यंत आलेले दु:खद अनुभव जगण्याची प्रेरणा देतात. आपल्या लेखनातून 'मी' च्या दु:खातून जीवनातील वास्तवता, जीवनवाद ते इतरांना सांगतात. जीवन हे जगण्यासाठी आहे, मरण्यासाठी नव्हे हा आदर्श ते आपल्या लेखनातून मांडतात.

शीलावतीबाई केतकरांचे 'मीच हे सांगितले पाहिजे' हे 'मी' च्या आविष्काराचे लेखन आहे. शीलावती बाईंच्या व्यक्तिमत्त्वावर श्री. व्यं. केतकरांची छाप पडलेली आहे. जन्माने परदेशी असून देखील त्यांनी भारतीय नारींना लाजवील अशी संस्कृती, आचार-विचार, दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती शीलाबाईंच्या लेखनातून दिसते. भारतीय संस्कृतीबद्दलचा आदर, केतकरांविषयीची पतीनिष्ठा, नम्रता, विवेकशील व्यक्तिमत्त्व इत्यादी गुणांचे दर्शन घडते.

एकंदरित नवसाहित्यात 'मी' भोवतीचे जग या गोष्टीला जास्त महत्त्व आलेले आपल्याला दिसून येते. 'मी' चा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, विविध जीवनविषयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगवेगळ्या पातळीवरचा असतो.

आठवणी-अनुभव या प्रकारातील 'मी' चा आविष्कार हा आठवणी व अनुभवांतच रमलेला असतो. लघुनिबंधातील 'मी' हा घटना, प्रसंग, अनुभव यांच्याविषयीचे चिंतन व दृष्टिकोण स्पष्ट करत असतो. प्रवासलेखातील स्थळे, गावे, प्रदेश, निसर्ग यांच्या गुणवैशिष्ट्यांनी मोहीत झालेल्या 'मी' चे दर्शन घडवितात. व्यक्तिचित्रातील 'मी' व्यक्तिच्या गुण, दोष, मर्यादा जाणवलेला असतो. ललित लेखातील 'मी' हा जीवनाविषयीच्या कळ्या-पाकळ्या दाखवून देतो. एकाच लेखकाच्या साहित्यकृतींचा संग्रह असेल तर, 'मी' च्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला जातो.

थोडक्यात, 'मी' चा अविष्कार हा जमेल तेवढ्या बाळबोध, बोली भाषेत ललित लेखनातून होत असतो.

## १.६ समाविष्ट होणारे घटक : व्यक्ती, प्राणी, निसर्ग

ललित लेखकाला 'मी' च्या अविष्काराबरोबरच, प्रवास वर्णने करावी वाटतात. कधी कधी त्याच्या लेखणात व्यक्ती, प्राणी, निसर्ग यांचादेखील समावेश होतो. त्या व्यक्ती लेखकाला किंवा 'मी' ला कुठेतरी भेटलेल्या असतात. मात्र त्या व्यक्ती चित्रात जशा दिसतात. त्याच स्वरूपात भेटलेल्या असतात असे नाही. त्या व्यक्ती त्यांच्या लेखनातून वास्तव वाटत असल्या तरी प्रत्यक्ष समाजात त्या असतीलच असे नाही. त्या व्यक्ती प्रत्यक्षातील एखाद्या व्यक्तीच्या आधारे कल्पिलेल्याही असू शकतात. पण त्या व्यक्तीचे गुण, वागणे एकंदरित व्यक्तिमत्त्व हे समाजातीलच असते. समाजाला ज्ञात असेच असते. लेखक हा त्या व्यक्तिकडे कोणत्या दृष्टिने पाहतो त्या व्यक्तीला कसा अनुभवतो किंवा अनुभवलेल्या व्यक्तीला कसे समजून घेतो किंवा त्या व्यक्तिमत्त्वाचा कसा अर्थ लावतो हे महत्त्वाचे आणि या प्रक्रियेतूनच 'मी' चा, लेखकाचा समाजाविषयीचा अनुभव प्रकट होत असतो.

प्राणी आणि निसर्ग यांच्याबाबतीतही आपल्याला असेच म्हणता येईल. लेखकाच्या अवती–भवती असणारे प्राणी, त्यांच्या सवयी, त्यांचे माणसात मिसळणे, मानव समाजाशी एकरूप होणे या गोष्टी लेखकाने जवळून पाहिलेल्या असतात व लेखनाच्या ओघामध्येच पक्षी, प्राणी यांचे जीवन आणि मानवी जीवन एक होऊन जाते. मानव समाजाचे व प्राण्यांच्या जगाचे अतूट व प्रेमाचे नाते असते. तसेच निसर्गाचे व समाजाचे परस्परावलंबन लेखकाला त्याच्या लेखनातून कसे दिसते. निसर्ग हा माणसाचा मित्र, सवंगडी आहे. त्याच्या सानिध्यात माणसाचा वेळ आनंदात जातो. सर्व कष्ट तो विसरून जातो. त्यामुळे लेखकाच्या लेखनातून सहजगत्या निसर्ग अवतरतो. वृक्षांचे रंग, रूप, सावली, सौरभ, त्यांचे संगीत यांचे

लोभसवाणे रूप लेखकाला मोहित करते व वृक्षांविषयी सुहृदभाव अगदी साहजिकच उत्पन्न होतो. वृक्षाविषयी अगदी सहजपणे लेखक लिहून जातो.

रघुवीर सामंतांचे 'हृदय', पु. ल. देशपांड्यांचे 'गणगोत', 'व्यक्ति आणि वल्ली', व्यंकटेश माडगूळकरांचे 'माणदेशी माणसं,' प्रभाकर पाध्येंचे 'व्यक्तिवेध' आणि विद्याधर पुंडलिक यांचे 'आवडलेली माणसं' यांसारखे लेखन व्यक्तिचित्रांनी भरून गेलेले आहे.

जयवंत दळवी 'सारे प्रवासी घडीचे' मधील न्हानु कांबळी, आबा, मास्तर ही व्यक्तिचित्रे, चि. वि. जोशींचा गुंड्याभाऊ, चिमणराव, वि. द. घाटेंचे 'काही म्हातारे व एक म्हातारी' प्रभाकर पाध्येंचे' 'आगळी माणसे', 'प्रकाशातील व्यक्ती.' त्यामध्ये व्यक्तिचित्रे आपल्याला आढळून येतात.

पु. लं. चे 'नारायण' हे व्यक्तिचित्र वाचताना आपल्यासमोर 'नारायण' ठसठशीत स्वरुपात उभा राहतो. स्मरणात राहतो, तो नारायणाचा स्वभाव, त्याची सदैव कामात मग्न असण्याची वृत्ती आणि मूर्ती. 'अंतूबर्वा' हे व्यक्तिचित्र नाव घेतल्याबरोबर डोळ्यासमोर उभे राहते. जगाचे तत्वज्ञान कोळून पिलेल्या या कोकणी माणसाची छाप जशीच्या तशीच वाचकावर पडते. माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसांतील' 'गणा भामटा' बऱ्याच वर्षांपूर्वी वाचून सुद्धा आपल्या चांगला लक्षात राहिलेला असतो. ही व्यक्तिचित्रे फक्त त्या ठराविक काळापुरतीच न राहता ती विशाल पातळीवर सर्वांचीच होऊन राहतात. ती व्यक्ती समजून घेताना वाचकाला त्यातील 'मी' चा आधार घ्यावा लागतो.

तसेच, श्रीनिवास कुलकर्णी यांच्या लेखनातून प्राणी, पक्षी यांचे दर्शन घडते. त्यांच्याविषयी मांडलेले विचार दिसतात. डोह, सोन्याचा पिंपळ ही पुस्तके विचारात घ्यावी

लागतात. 'मारूती चित्तमपल्ली' यांचं जंगलाचं देणं, डॉ. सलीम अली यांचे 'द फॉल ऑफ ए स्पॅरो' ह्या आत्मचरित्रात्मक पुस्तकात आपल्याला पक्षी, निसर्ग यांचे निरीक्षण व श्रेष्ठत्व स्पष्ट झालेले दिसून येते.

**१.७ जीवनातील स्मृती आणि संदर्भ :–**

माणसाला आलेले अनुभव हे त्याच्या आयुष्याच्या शिदोरीत जमा होतात. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या न्यायाने माणसाने वागले पाहिजे. अन्यथा, अनुभव घेऊनच शिकलं पाहिजे. ललित साहित्याच्या क्षेत्रामध्ये ज्याप्रमाणे प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण, लेख, विनोदी लेखन इत्यादींबरोबर 'आठवणी व अनुभवांचा' देखील ललित साहित्यामध्ये समावेश होतो. स्वत:च्या किंवा दुसऱ्याविषयीच्या आठवणी–अनुभव सांगताना विषयालाच, अनुभवांलाच जास्त प्राधान्य दिले जाते. एखाद्या व्यक्तिविषयी इतरांनी सांगितलेली माहिती त्यापेक्षा एखाद्या व्यक्तीच्या सानिध्यात, स्वत: व ती व्यक्ती यांच्यात साम्य काय इथे 'मी' त्याच्या लेखनाची स्थिती आनंदाप्रत जाऊन पोहोचते.

न. वि. गाडगीळ यांची 'सालगुदस्त', 'अनगड मोती,' 'स्मृतिशेष', 'पाव आणि मिसळ' यांसारखी किंवा मधुकर केचे यांचे 'आखर आंगण', कृष्णाबाई मोटे यांचे 'दृष्टीआडच्या सृष्टीत' ही पुस्तके या दृष्टिने पाहण्यासारखी आहेत.

'अस्ताई' १५ जुलै १९६२, 'माझे संगीत' १९६४, 'अंतरा' १९६७ ही केशवराव भोळेंची पुस्तके. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे 'येरवडा विद्यापीठातील दिवस' आणि 'आठवणीतल्या आठवणी', मोहन धारिया यांचे 'बोल अनुभवाचे' (२४ जुलै २००४) यांमधून व्यक्तिंना आलेले अनुभव तसेच 'गतजीवनातील स्मृती' व्यक्त झालेल्या आहेत.

तुकाराम, कुंकू, अमृत मंथन हे चित्रपट देखील आठवणी व गतस्मृतींना उजाळा देणारे आहेत. लेखकाच्या लिखाणामधून वेगवेगळे घटक प्रकट होत असतात. त्याप्रमाणेच, त्याच्या जीवनातील आठवणी व अनुभव देखील चित्रीत केलेले असतात. पूर्वी घडून गेलेल्या गोष्टी स्मृतीच्या पातळीवर जतन केल्या जातात. त्या भूतकाळातील गोष्टींना व अनुभवांना लेखक वर्तमानकाळात वाचकांसमोर उभे करतो. भूतकाळात वाचकांना घेऊन जातो. भूतकाळातील घटना हुबेहूब वाचकांसमोर उभ्या करतो.

**१.८ ललित लेखन प्रकाराचे विशेष / भाषाशैली :–**

लेखक ललितकृती निर्माण करतो अगर लिहितो तेंव्हा खरोखरच तो त्या भागाचे संशोधन करीत असतो. शब्द हे फक्त एक साधन आहे. पण, शब्दावेगळे कलाकृतीचे अस्तित्वच नसते. लेखनातून प्रकट झालेली पात्रे, प्रसंग, शब्दरचना, म्हणजेच ती कलाकृती असते. ललित लेखनातील प्रत्येक शब्द जिवंत आहे, चैतन्याने नुसता थुरथुरत आहे अशी जाणीव लेखकाला असते. आणि नेमका तोच व त्याठिकाणी योग्य असा शब्द त्यावेळी सापडणे म्हणजेच निर्मिती अशी लेखकाची भावना असते.

''ज्याचे दर्शन घडवायचे त्या जीवनांगावर, जो दर्शन घडविणार त्या लेखकावर व ज्या वाङ्मय प्रकारातून ते घडणार त्या वाङ्मय प्रकारावर म्हणजे ह्या तीन गोष्टींवरच ललित भाषेचे स्वरूप अवलंबून असते. लेखकाला त्याच्या लिखाणातून आपल्या शब्दांच्या ताकदीवर आत्मस्थिती किंवा लेखनातील 'मी' प्राप्त होणे यावरच लेखनकार्य सफल होते.''[१४]

१. ललितामध्ये नैसर्गिक बनावटपणाच अधिक असतो.

२. 'ललितचा सर्व सामान्य विशेष म्हणजे 'ती दिसते सोपी पण असते कठीण.'

३. व्यक्ती तितक्या प्रकृती, त्याप्रमाणेच ललित लेखक तेवढ्या ललित भाषा.

४. गो.म. कुलकर्णी यांनी ललित गद्याविषयी काही विचार व्यक्त करताना ललित गद्याच्या भाषेसंदर्भातही आपले विचार पुढीलप्रमाणे मांडलेले आहेत. ते म्हणतात, ''ललित वाङ्मयाची भाषा ही अधिक घरगुती असते; ती आपल्या अधिक परिचयाची असते; ती अकृत्रिम असते; ती साधलेली नसते किंवा मुद्दाम घडवून बनविलेली नसते तर आपल्या नेहमीच्या हरघडीच्या व्यवहारात आपण जी भाषा वापरतो; तीच ती असते; लेखनासाठी तिच्यात मुद्दाम असा बदल केलेला नसतो. तिचे नेहमीचेच स्वरूप कायम ठेवलेले असते. म्हणूनच ती आपणांस ओळखीची वाटते; ती आपलीच, आपल्या आईची, आपल्या मित्राची वा मैत्रिणीची भाषा आहे हे जाणवते. तिच्याबद्दल आपल्या मनात जिव्हाळा असतो, आपुलकी असते. ''[१५]

५. लेखकाने जे पाहिले, जे अनुभवले, जे जाणवले ते इतरांच्या डोळ्यासमोर हुबेहूब उभे करण्याचे सामर्थ्य वा कौशल्य ललित लेखनातून प्रकट होते.

६. प्रासाद आणि लालित्य हे ललित वाङ्मयाच्या भाषेचे विशेष आहेत.

७. घरगुती शब्दांचा वापर ललित मध्ये केलेला असला तरी अभिजातपणा हे खरेखुरे या भाषाशैलीचे वैशिष्ट्य आहे.

८. कोणत्याही काळातील, स्थळातील व्यक्तींना समजेल आणि सरस वाटेल असे ललितचे स्वरूप असते.

९. ललित वाङ्मयाची भाषा ही रससापेक्ष असते व या रसविषयक अपेक्षांच्या पूर्ततेवरच त्यातील लालित्य अवलंबून असते.

१०. 'मी' चा आविष्कार ललित वाङ्मयाद्वारे प्रकटत असतो. 'मी' हा फक्त लेखकाच्या व्यक्तिगत पातळीपर्यंत मर्यादित न राहता तो 'मी' म्हणजेच प्रत्येक वाचकच असतो. लेखकाचे अस्तित्त्व बाजूला राहते व वाचक त्या 'मी' शी एकरूप होतो. अशी ताकद ललित भाषेत असते.

अशाप्रकारे ललित लेखनाची भाषा ही साधी, सरळ, सोपी जरी वाटत असली तरी ती शब्दामध्ये प्रकट करणे खूप कठीण असते. ललित भाषा ही रसपूर्ण, लालित्याने भरलेली व प्रासादयुक्त भाषा असते. प्रत्येक लेखकाची लेखनाची शैली वेगळी त्यामुळे प्रत्येक लेखकाने चित्रीत केलेले ललित साहित्याचे स्वरूप आपल्याला वेगवेगळे वाटते. जे भूतकाळात घडून गेले, पाहिले, अनुभवले ते लेखकाने जसेच्या तसे शब्दात उतरवलेले असते. लेखकाची ललितकृती वाचत असताना वाचक ललितमय निर्माण होतो आणि त्यातच लेखकाचे यशस्वीपण प्रकट होते. तो यशस्वी ललितलेखक ठरतो. कारण, त्या गोष्टी बऱ्याच वर्षांनी देखील वाचकासमोर जशाच्या तशा उभ्या राहतात.

## १. **सारांश :-**

ललितलेखन हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून आता अस्तित्वात आला आहे. लेखकाला गतजीवनातील आठवणी, जीवनात भेटलेल्या व्यक्ति, घडलेल्या घटना; प्रसंग, केलेल्या प्रवासाची वर्णने, मनाला मोहविणारा निसर्ग, रूढी–परंपरा याविषयी स्वत:ला वाटणारे विचार या सर्व गोष्टी जशाच्या तशा, रसाळ भाषेतून वाचकासमोर उभ्या करता येतात. एक स्वतंत्र विचार, स्वतंत्र दृष्टी, स्वतंत्र भाषा यांचा वापर ललितलेखनात लेखकाला मुक्तपणे करता येतो. ललितगद्यलेखन हे 'मी' च्या आविष्काराने नटलेले असते, त्यामुळे ते लिहिताना लेखकाने सर्वांगपरिपूर्णतेने मन मोकळे केलेले असते व ते सर्व अनुभव घटना ह्या फक्त

लेखकापुरत्याच मर्यादित न राहता, अखिल मानवजातीच्या संदर्भात लागू पडतात. त्यामुळे ललित हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार तयार झाला.

## २. समारोप :-

या प्रकरणात आपण ललितगद्य लेखनाचे स्वरूप आणि विशेष पाहिले. ललितलेखन म्हणजे काय हे जाणून घेतले व ललितचा अर्थ समजावून घेतला. ललितच्या व्याख्या पाहिल्या. ललितगद्य लेखनाचा प्रवास लघुनिबंध, ललितगद्य, मुक्तगद्य/ललितलेखन या टप्प्यांमधून कसकसा होत गेला, याचा आढावा घेतला. तसेच प्रवास वर्णनामधून ललितगद्य कसे विकसित होत गेले, ललितमधून 'मी' चा अविष्कार कसा रूजत गेला, व्यक्ति, प्राणी, निसर्ग यांनादेखील ललितभाषेने कसे वेढले याचा विचार आपण केला. प्रत्येक लेखक आपल्या जीवनात भेटलेल्या व्यक्ति, घटना, प्रसंग आणि आठवणी यांचे हुबेहुब व लालित्यपूर्ण वर्णन करू लागले व ललितगद्यात या घटकांचा समावेश झाला. हे आपण अभ्यासले. शेवटी आपण ललितलेखन प्रकाराचे विशेष व भाषाशैली कशी असते हे पाहिले.

पुढच्या प्रकरणात आपण अरूणा ढेरे यांच्या ललित लेखनाच्या प्रेरणा व स्वरूप या घटकांचा अभ्यास करूया.

***

# संदर्भ सुची


१. मराठी–मराठी शब्दकोश : अनमोल प्रकाशन, २००४.

पृ.९०३.

२. कुलकर्णी भीमराव : 'प्रदक्षिणा खंड पहिला'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
(ललितगद्य हा लेख)

पृ.३८१.

३. वर्तक चंद्रकांत : 'मावंदे'
'निवडक प्रवास वर्णनांची समीक्षा'
प्रथमावृत्ती १९९३.

पृ.३८.

४. यादव आनंद : 'प्रदक्षिणा खंड – २'
स्वातंत्र्योत्तर काळातील ललितगद्य.

पृ.३१९.

५. डहाके वसंत आबाजी : 'समकालीन साहित्य'
ललितगद्य.

पृ.८०.

६. यादव आनंद : 'ललित गद्याचे तात्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास'

पृ.३२.

७. कुलकर्णी वा.ल. : 'वाङ्मयातील वादस्थळे'
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
दुसरी आवृत्ती – १९६२.

पृ.४२.

८. यादव आनंद : 'वाङ्मयीन शैली आणि तंत्र'
ललितगद्य.
पृ.४१.

९. कुलकर्णी वा.ल. : 'साहित्य आणि समीक्षा', १९६२
'आजचे मराठी ललितगद्य : काही विचार'
पृ.४६.

१०. काणेकर अनंत : 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे'
चौथी आवृत्ती, १९६७.
मुंबई.
पृ.३६.

११. कुलकर्णी भीमराव : प्रदक्षिणा खंड पहिला,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
(ललितगद्य हा लेख)
पृ.४००.

१२. देशपांडे पु.ल. : अपूर्वाई
आवृत्ती सोळावी, पुणे १९९९.
पृ.३८.

१३. कुलकर्णी भीमराव : प्रदक्षिणा खंड पहिला
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
ललितगद्य हा लेख.
पृ.३९४.

१४. माडखोलकर ग.त्र्यं. : जीवनसाहित्य,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पृ.९४,९५.

१५. कुलकर्णी गो.म. : 'रसग्रहण कला आणि स्वरूप'
कॉन्टिनेन्टल् प्रकाशन, पुणे.
द्वितीयावृत्ती १९७३.
पृ.१९.